# प्रेस नोट

ला.प्र.वि.,वाशिम.जि.वाशिम
कॅम्प – मेहकर जि.बुलढाणा
दि.२८.०२.२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नांव | अँन्टी करप्शन ब्युरो, वाशिम जि.वाशिम |
| २ | आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | लोकसेवक श्री.जनार्धन मनोहर बोदडे वय ६१ वर्ष व्यवसाय सहा. सरकारी अभियोक्ता व सहायक सरकारी वकील नेमणुक अतिरीक्त सत्र न्यायालय मेहकर जि.बुलढाणा रा. C/o भास्कर निकम, संभाजीनगर, मेहकर ता.मेहकर जि.बुलढाणा, मुळ रा. सावजी ले आऊट प्लॉट नं.३० खामगांव जि.बुलढाणा |
| ३ | अपराध घटला दिनांक वेळ | दि.२८.०२.२०२५ चे ११:११ वा ते ११:२२ वा. दरम्यान |
| ४ | मागणी केलेली लाचेची रक्कम | ३,००,०००/-रुपये |
| ५ | तडजोडीअंती मागणी केलेली लाच रक्कम | २,५०,०००/-रुपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | १,००,०००/-रुपये पहिला हफता |
| ७ | घटना स्थळ | अतिरीक्त जिल्हा व सत्र न्यायालय मेहकर जि.बुलढाणा चे ईमारत मध्ये |

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की, तकारदार यांचे फिर्याद वरुन पो.स्टे.डोणगांव येथील दाखल गुन्हयाच्या कोर्ट केस मध्ये आरोपीला शिक्षा होईल अशी बाजु मा.कोर्टात मांडण्यासाठी तकारदार यांना आलोसे श्री जे.एम. बोदडे, सहायक सरकारी वकील हे ३,००,०००/- रुपयाची मागणी करीत असल्याची तकार दि.२४.०२.२०२५ रोजी तकारदार यांनी दिली. सदर तकारीची पडताळणी दरम्यान आलोसे यांनी तडजोडीअंती २,५०,०००/-रुपयाची पंचासमक्ष मागणी केली व सापळा कारवाई दरम्यान आज दि.२८.०२.२०२५ रोजी पंचासमक्ष लाचेचा पहिला हप्ता १,००,०००/-रुपये स्विकारल्या वरुन आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले असुन तकारदार यांनी दिलेल्या फिर्यादवरुन नमुद आलोसे यांचे विरुध्द पोलीस स्टेशन मेहकर जि.बुलढाणा येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक, श्री.मारुती जगताप, अपर पोलीस अधिक्षक श्री.सचिद्र शिंदे, ला. प्र.वि. अमरावती परीक्षेत्र अमरावती, यांचे मार्गदर्शनात सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक बालाजी आर तिप्पलवाड, ला.प्र.वि., वाशिम जि.वाशिम तसेच पथकातील कर्मचारी पोहेकॉ विनोद मारकंडे, आसीफ शेख योगेश खोटे पोना. रविंद्र घरत चापोहवा मिलींद चन्नकेशला यांनी केली.

शासकीय लोकसेवकाने खाजगी इसमाने शासकीय काम करुन देण्यासाठी व करण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अँन्टी करप्शन ब्युरो, वाशिम दुरध्वनी क्रमांक ०७२५२/२३५९३३, टोल फ्रि.नं.१०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन बालाजी आर.तिप्पलवाड, पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबिंधक विभाग, वाशिम जि.वाशिम यांनी केले आहे.

(बालाजी आर.तिप्पलवाड)
पोलीस निरीक्षक
तथा प्रभारी पोलीस उपअधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम.

Scanned with OKEN Scanner